# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email :

जा क्र तंशविकापु/ससावि/२०११/ 102_69 दिनांक २६/११/२०११

26 DEC 2011

**तातडीचे**

प्रति,

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन पुणे / सोलापूर/कोल्हापूर/कराड/मिरज/अवसरी खु/~~नासगाव~~ नासगाव

शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे

म रा हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड / अवसरी खु

शासकीय औ निर्माण शास्त्र महाविद्यालय कराड

विषय : संस्थेतील नवीन / वाढीव तसेच दुरुस्ती बांधकामाची माहिती

संदर्भ : मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्र ९/बांधकाम/२०११-१२/६५० दिनांक १४/१२/२०११

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत चालू असलेल्या बांधकामाच्या खर्चाचा मासिक अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेपर्यत सादर करण्याबाबत आपणास वारंवार कळविण्यात आले आहे. तथापी आपणाकडून सदर माहिती या कार्यालयास विहीत मुदती प्राप्त होत नाही. सदर माहिती हि शासनास सादर करावयाची असल्याने ती आपणाकडून प्राप्त न झाल्याने ती पुढे पाठविणे शक्य होत नाही. सदर माहिती हि दर महिन्याच्या १० तारखेपर्यत संचालनालयास सादर करण्याबाबत मा संचालक यांनी संदर्भिय पत्राव्दारे देखील निर्देश दिलेले आहेत. तसेच सदर माहिती प्राप्त न झाल्यास विभागीय कार्यालया मार्फत प्राप्त होणा-या बांधकामाच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येणार नाही असे कळविले आहे.

आपणाकडून माहे नोव्हेंबर २०११ आखेर पर्यतीच्या बांधकाम खर्चाची माहिती या कार्यालयास आज तागायत प्राप्त न झाल्याने ती आपण या कार्यालयास सादर करावी. तसेच पुढील प्रत्येक महिन्याची माहिती दर महिन्याच्या ५ तारखेपर्यत पोहचेल या बेताने या कार्यालयास सादर करावी. सदर माहिती हि मा संचालक कार्यालयास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत सादर करावायची असल्याने या बाबत प्रथम प्राधान्यसने कार्यवाही करावी.

(डी एन शिंगाडे)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीलय कार्यालय, पुणे

प्रत : श्री शिंदे प्रोग्रामर, यांना सदर ची माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी

land